महाराष्ट्र जनविश्वास (तरतूदींची सुधारणा) विधेयक २०२६ ” अंतर्गत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील तरतूदींचे तर्कशुध्दीकरण, सुसुत्रिकरण व निरपराधीकरण करण्यासाठी राज्यस्तरीय समिती स्थापनेबाबत....

**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक: जीपनि-२०२५/प्र.क्र.११३/ई-१३३८९८६/पंरा-2.

बांधकाम भवन, २५मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई- ४०० ००१.

दिनांक : ९ फेब्रुवारी, २०२६

**वाचा** :-

(१) महाराष्ट्र जनविश्वास (तरतूदींची सुधारणा) अधिनियम क्रमांक ५६ , सन २०२५, दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ ची अधिसूचना

(२) सामान्य प्रशासन विभाग (र. व का.) चे क्रमांक संकिर्ण २०२५/र.व का.-१, दिनांक २३ डिसेंबर, २०२५ चे पत्र

(३) सामान्य प्रशासन विभाग (र. व का.) चे क्रमांक संकिर्ण २०२६/र.व का.-१, दिनांक ५ जानेवारी, २०२५ चे पत्र

**<u>प्रस्तावना</u> :-**

राज्यातील जन सामान्यांचे जिवनमान सुकर व्हावे आणि व्यावसायिकांना व्यवसाय करणे अधिक सुलभ व्हावे, याकरिता, राज्य शासनाने, केंद्र शासनाच्या जन विश्वास अधिनियम, २०२३ च्या धर्तीवर, महाराष्ट्र जनविश्वास (तरतुदींची सुधारणा) अधिनियम, तयार करण्याचे प्रस्तावित आहे. पहिल्या टप्प्यात सात राज्य अधिनियमांमध्ये सुधारणा करण्याबाबतचे “महाराष्ट्र जनविश्वास (तरतूदींची सुधारणा) विधेयक २०२५” नागपूर येथे झालेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मांडण्यात आले होते. विधिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार “महाराष्ट्र जनविश्वास (तरतूदींची सुधारणा) अधिनियम क्रमांक ५६, सन २०२५ दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजी अधिसूचीत करण्यात आला आहे. दुसऱ्या टप्प्यात उर्वरित राज्य अधिनियमांमध्ये सुधारणा करण्याकरिता, “महाराष्ट्र जनविश्वास (तरतूदींची सुधारणा) विधेयक २०२६” येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडण्याचे प्रस्तावित आहे.

त्यासाठी ग्रामविकास विभागाच्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील तरतूदींचा अभ्यास करुन गुन्हेगारी, दंडात्मक प्रक्रिया केंद्रीत तरतूदींचे तर्कशुध्दीकरण, सुलभीकरण व निरपराधीकरण करण्याच्या अनुषंगाने मा. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र जनविश्वास (तरतूदींची सुधारणा) विधेयक २०२६ " अंतर्गत व्यवसाय करण्याचे सौकर्य (Ease of Doing Business) वाढविण्याच्या दृष्टीने अपराधांच्या शिक्षेच्या तरतूदींचे निरपराधीकरण किंवा यथास्थितीत तर्कसंगत करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील गुन्हेगारी, दंडात्मक प्रक्रिया केंद्रीत तरतूदींचे तर्कशुध्दीकरण, सुलभीकरण व निरपराधीकरण करण्याची शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय समिती गठित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायती राज विभाग, मंत्रालय, मुंबई | - अध्यक्ष |
| २) | श्री. आनंद भंडारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहिल्यानगर | - सदस्य |
| ३) | श्री. मनोज रानडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर | - सदस्य |
| ४) | श्री. माणिक दिवे, अपर आयुक्त (विकास), कोकण विभाग, कोकण | - सदस्य |
| ५) | श्रीमती वर्षा मु. भरोसे, सहसचिव (पंरा-२/केंयो ), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई . | - सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :-**

**१)** सदरहू समिती अभ्यास / समिक्षा करुन उपरोक्त अधिनियमात सुधारणांची शिफारस करेल. प्रारूप विधेयक प्रसिध्द केल्यानंतर प्राप्त हरकती, सूचना व शिफारशींचा अभ्यास करुन आवश्यक सुधारणांची शिफारस करेल.

**२)** अधिनियमातील फौजदारी तरतुदीसंदर्भात अधिनियम लागू झाल्यापासून किंवा मागील १० वर्षात ज्या तरतुदींविरुध्द जास्तीत जास्त गुन्हे, खटले दाखल झाले आहेत आणि ते वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत, अशा शिक्षेच्या तरतुदींचे अपराधमुक्तीकरण करणे (Decriminalisation) किंवा यथास्थिती तर्कसंगत करणे, तसेच, अधिनियम लागू झाल्यापासून किंवा मागील दहा वर्षात अधिनियमातील ज्या फौजदारी स्वरुपाच्या तरतुदींचा एकदाही वापर केला गेला नाही, अशा तरतुदी रद्द करण्याबाबतही विचार करुन शिफारस करेल.

**३)** आवश्यकतेनुसार समिती बैठका घेईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२०९११०१४१५६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VARSHA M BHAROSE

Digitally signed by VARSHA M BHAROSE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2F3096A175796CC670522C4AFF97DA20B708981B5122E87C8346C4CC7468F821, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1BD844032884BBF2167BC99CD85325223ACEEF69D02BD455B7CA6972491623E0, cn=VARSHA M BHAROSE
Date: 2026.02.09 18:17:28 +05'30'

(व. मुं. भरोसे)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

1. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

2. मा. उप मुख्यमंत्री, नगर विकास, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
3. मा. उप मुख्यमंत्री, वित्त व नियोजन, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
4. मा. मंत्री (ग्रामविकास) , महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
5. मा. राज्यमंत्री (ग्रामविकास), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
6. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
7. प्रधान सचिव (र. व का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. श्री. माणिक दिवे, अपर आयुक्त (विकास), कोकण विभाग, कोकण.
१०. श्री. आनंद भंडारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर.
११. श्री. मनोज रानडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ,पालघर.
१२. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
१३. सर्व जिल्हाधिकारी, (जिल्हाधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून).
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य.
१५. कार्यासन पंचायत राज-2 (निवडनस्ती).